महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५५ वे | दिनांक : ११/०९/२०२६ | वार : शुक्रवार

## एमपीएससी परीक्षेच्या तारखांचा खेळ सुरूच; गट-क पूर्व परीक्षा आता ३ जानेवारीला!

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांचे वेळापत्रक पुन्हा एकदा कोलमडले असून, गट-क संयुक्त पूर्व परीक्षा 2026 तिसऱ्यांदा पुढे ढकलण्यात आली आहे. 25 ऑक्टोबर 2026 रोजी नियोजित असलेली ही परीक्षा आता 3 जानेवारी 2027 रोजी घेतली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

आयोगाचे उपसचिव विवेक देशमुख यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, परीक्षा प्रशासकीयदृष्ट्या सुरळीत पार पाडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यात प्रामुख्याने पुढील कारणांचा समावेश आहे:

•विविध जिल्ह्यांतील परीक्षा केंद्रांची उपलब्धता आणि स्थानिक प्रशासनाचे अहवाल.

•सणासुदीचा काळ, संभाव्य वाहतूक कोंडी आणि उमेदवारांचा प्रवास.

•राज्य सेवा मुख्य परीक्षा 2026, इतर भरती संस्थांच्या परीक्षांचे वेळापत्रक आणि विधानसभेचे हिवाळी अधिवेशन.

यापूर्वी ही परीक्षा 12 जुलै, 27 सप्टेंबर आणि 25 ऑक्टोबर अशा 3 वेगवेगळ्या तारखांना नियोजित करण्यात आली होती. वास्तविक पाहता, 2026 च्या भरतीची संपूर्ण प्रक्रिया डिसेंबरअखेर पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, आता पूर्व परीक्षाच 2027 मध्ये जात असल्याने संपूर्ण प्रक्रिया आणखी लांबणार आहे. वारंवार होणाऱ्या या बदलांमुळे परीक्षार्थींमध्ये प्रचंड नाराजी आणि चिंतेचे वातावरण आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी हा निर्णय म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी क्रूर खेळ असल्याचा आरोप केला आहे. सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये वडेट्टीवार म्हणतात की, 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची 25 ऑक्टोबरला होणारी परीक्षा अचानक थेट 3 जानेवारीवर ढकलण्यात आली आहे. परीक्षा अवघ्या काही दिवसांवर आलेली असताना असा निर्णय घेणे म्हणजे रात्रंदिवस तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी, स्वप्नांशी आणि भविष्याशी चालवलेला क्रूर खेळ आहे. केंद्रांची अनुपलब्धता, वाहतुकीच्या अडचणी आणि सणासुदीचा काळ ही काय कारणं आहेत? वेळापत्रक जाहीर करताना याचे नियोजन केले नव्हते का? अचानक घेतलेल्या संशयास्पद निर्णयामागे या परीक्षेतही काहीतरी मोठा घोळ शिजतोय का, असा संशय निर्माण होत आहे! विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बाजार मांडणाऱ्या हा कारभार चुकीचा आहे. MPSC च्या बेजबाबदार नियोजनाचा फटका नेहमी गरीब शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या मुलांनीच का सहन करायचा? हा लाखो होतकरू तरुणांच्या संयमाचा अंत आहे. विद्यार्थ्यांचा हा वाढता संताप या संवेदनाहीन सरकारला आणि आयोगाला वठणीवर आणल्याशिवाय राहणार नाही!'

## मुंढवाप्रकरणी पार्थ पवारांनी लवकरात लवकर वस्तुस्थिती मांडावी

**पुणे :** महाराष्ट्रातील शेतकरी सध्या दुहेरी संकटाचा सामना करत असून, विदर्भात 40 ते 45 टक्के, मराठवाड्यात 60 टक्क्यांपर्यंत तर पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत 30 ते 40 टक्क्यांपर्यंत पावसाची कमतरता आहे. त्यामुळे खरीप हंगाम मोठ्या अडचणीत आला असून आगामी रब्बी हंगामाचीही चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्रातील विविध भागांचा दौरा करून तेथील परिस्थिती जाणून घेत असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. विदर्भातील दौऱ्यानंतर त्यांनी विभागीय आयुक्तांची भेट घेत शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, पीक विमा, कर्जमाफी, पशुधन आणि धान उत्पादकांच्या प्रश्नांवर सरकारकडे विविध मागण्या मांडल्या. मुंढवा जमीन प्रकरणात पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना केल्याच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या कार्यवाहीवर भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी पार्थ पवार यांनी मात्र लवकरात लवकर पत्रकार परिषद घेऊन या प्रकरणातील वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, असे म्हटले. यापूर्वी अजित पवार स्वतः माध्यमांसमोर येऊन विविध प्रकरणांवरील आपली भूमिका स्पष्ट करत असत. त्याच पद्धतीने पार्थ पवार यांनीही पुढे येऊन नेमके काय प्रकरण आहे, याची माहिती द्यावी, असे रोहित पवार म्हणाले. या प्रकरणाच्या निमित्ताने भाजप मित्रपक्षातील नेत्यांवर कशा पद्धतीने राजकारण करते, हे आगामी काळात समोर येईल, असा दावाही त्यांनी केला. मात्र, न्यायालयीन प्रकरण असल्याने न्यायालयाने पोलिसांकडे हा प्रश्न नेमक्या कोणत्या कारणामुळे उपस्थित केला, यावर आपण भाष्य करू शकत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आयआयटी-आयआयएम नाही, मग एमपीएससीचेच पेपर का फुटतात? - सुप्रिया सुळे



**पुणे :** देशात आणि राज्यात एमपीएससी आणि युपीएससीच्या विद्यार्थ्यांचे प्रश्न अतिशय गंभीर बनले आहेत. मराठा, ओबीसी आणि आदिवासी समाजाची मुले आंदोलने करत आहेत. राज्यात वाढती महागाई, बेरोजगारी, प्रचंड भ्रष्टाचार आणि दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व महत्त्वाच्या विषयांवर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. तसेच महायुतीमधील घटक पक्षांशी भाजपने कसे वागावे, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न असून मी त्यावर बोलणार नाही.

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या की, देशात IIT आणि IIM च्या परीक्षा होतात, तिथले पेपर का फुटत नाहीत? मग आपल्या MPSC परीक्षांमध्येच हे घोटाळे का होतात? पेपर फुटण्यामागचे कारण काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रातील शेतकरी जर AI तंत्रज्ञानाचा वापर करू शकत असेल, तर परीक्षा यंत्रणेत या तंत्रज्ञानाचा वापर का केला जात नाही? असा प्रश्नही त्यांनी विचारला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संजय राऊत हे देशाचे मोठे नेते आहेत. अजित पवारांच्या मृत्यूबद्दल त्यांचे जे काही म्हणणे असेल ते त्यांचे वैयक्तिक मत आहे; परंतु मी आता या विषयावर काहीही बोलणार नाही. तुम्हाला याबद्दल काही विचारायचे असेल, तर थेट सरकारला विचारा, कारण सर्व यंत्रणा सरकार चालवत आहे. मी या विषयावर बोललेले लोकांना आवडत नाही. कोणाच्याही भावनांचा अनादर करण्याचा माझा हेतू नव्हता, मी अत्यंत पोटतिडकीने आणि अंतकरणापासून बोलले होते. पण ते लोकांना आवडले नसेल, तर मी पुन्हा त्यावर बोलणार नाही; त्यामुळे तुम्ही सत्ताधाऱ्यांनाच हे प्रश्न विचारले पाहिजेत. तसेच पार्थ पवार प्रकरणाबाबत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला पाहिजे. ते गृहमंत्रीसुद्धा असल्याने या दोन्ही प्रश्नांची योग्य उत्तरे तेच देऊ शकतील.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्रात आमच्या सत्ताकाळातही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या; परंतु त्यानंतर शरद पवार यांनी ऐतिहासिक शेतकरी कर्जमाफी केली होती. सध्या राज्यातील परिस्थिती अत्यंत गंभीर असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाहीत. सध्याच्या सरकारने केलेली कर्जमाफी ही फसवी आहे, त्यांनी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कर्जमाफी केलेली नाही. सरकारने यावर तोडगा काढण्यासाठी तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलावून चर्चा केली पाहिजे. राज्यात सध्या जातीय तेढ निर्माण झाली असून ती अत्यंत चिंताजनक आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, एमपीएससीच्या परीक्षेमुळे निराश झालेल्या एका महिलेचा मला काल रात्री फोन आला होता. तिने संभाषणात आत्महत्या असा शब्द वापरल्याने मी तातडीने तिची माहिती स्थानिक पोलिसांना दिली. पोलिस यंत्रणेचे मी मनापासून आभार मानते, कारण त्यांनी वेळीच जाऊन त्या महिलेचे समुपदेशन केले आणि तिची समजूत काढली. या संपूर्ण प्रकरणात मुलांची काहीही चूक नसून सर्वस्वी परीक्षा यंत्रणेचाच दोष आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६


# झिरणीपाडा येथील पंचमी रेखाटन स्पर्धेचा निकाल जाहीर



**कन्नड (अरुण थोरात) :** झिरणीपाडा ता. साक्री येथे कै.मालतीबाई पवार स्मरणार्थ आयोजित पंचमी रेखाटन स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धकांनी पंचमी रेखाटन स्पर्धेत सहभाग घेतला. त्यात प्रथम क्रमांक- दिलीप भानशी मु.बालापूर ता.कळवण जि.नाशिक, द्वितीय क्रमांक- कु.महिमा पवार मु.रवळजी ता.कळवण जि.नाशिक, तृतीय क्रमांक- गोटीराम सुर्यवंशी मु.महूबंद ता.साक्री जि.धुळे, तर उत्तेजनार्थ विजेते- निंबा गावीत मु.अलियाबाद ता.बागलाण, लता साबळे मु.वाघाळे ता.जि.नंदुरबार, भाईदास पवार कैटपाडा ता.साक्री, कु.ज्योत्सना भोये नंदुरबार, हिरामन बागुल मु.मैंदाणे ता.साक्री जि.धुळे, राजेंद्र ठाकरे मु.हारपाडा ता.साक्री,अर्जुन गवळी मु.नागझिरी ता.साक्री जि.धुळे, महेंद्र गांगुर्डे चिपलीपाडा ता.साक्री जि.धुळे, योगेश गवळी मु.नळवाडपाडा ता.दिंडोरी, वैष्णवी गवळी मु.नळवाडपाडा ता.दिंडोरी, वसंत पवार झिरणीपाडा ता.साक्री, अजय पवार झिरणीपाडा ता.साक्री, राजेंद्र पवार झिरणीपाडा ता.साक्री हे पंचमी रेखाटन स्पर्धेचे विजेते घोषित करण्यात आले. पंचमी रेखाटन स्पर्धेचे परिक्षण आदिवासी संस्कृती अभ्यासक देविदास पंडीत पवार कैटपाडा ता.साक्री यांनी केले. ही पंचमी रेखाटन स्पर्धा प्रवीण नामदेव पवार झिरणीपाडा ता.साक्री यांनी आयोजित केली होती.पंचमी रेखाटन स्पर्धेचे हे सहावे वर्ष होते.

# कालिकादेवी विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा



**शिरूर कासार :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.)जि.बीड येथे 'स्वयंशासन दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका पार पाडतांना घेतलेला अनुभव त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी शाळा चालवून एक दिवस प्रशासनाचा अनुभव घेतला.शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे शिल्पकार आहेत.स्वयंशासन दिनातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण,जबाबदारीची जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण होतो.असे गौरव उदगार प्राचार्य भांगे साहेबांनी काढले.स्वयंशासन दिनाच्या दिवशी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत एक दिवसासाठी शाळा सुनियोजितपणे चालवली.सेवकापासून ते मुख्याध्यापका पर्यंतची सर्व कामे व्यवस्थितपणे पार पाडली.एक दिवसीय स्वयंशासन दिनानिमित्त मुख्याध्यापिका म्हणून कु.अल्फिया शेख, उपमुख्याध्यापक म्हणून चि.प्रतिक उगले,तर पर्यवेक्षक म्हणून चि.नैतिक धोत्रे,तर शिक्षक व शिक्षिका म्हणून कु.गिते आराध्या,कु.आर्या ढाकणे,सानिका नेटके, अंकिता साळुंके, सोनाली भुजबळ,चिं.दिपक पवार,अक्षय तांबे, अंगद बडे, विवेक नागरगोजे, जयराज खेंगरे, कु.गौरी हरिदास, प्रतीक्षा चांदणे, समृद्धी तुपे, तनुष्का ढाकणे, हर्षदा सकुंडे, वैष्णवी वालेकर इत्यादी विद्यार्थ्यांनी भूमिका पार पाडली.याप्रसंगी विद्यालयात उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# उर्दू अध्यापनाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड; AI च्या भूमिकेवर इकरात मार्गदर्शन





**जळगाव :** इकरा डी.एड. कॉलेज, इकरा बी.एड. कॉलेज आणि इकरा पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ‘उर्दू अध्यापनात AI ची भूमिका’ या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अब्दुल करीम सालार होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.हसीन अख्तर, अध्यक्ष,उर्दू अकादमी महाराष्ट्र आणि सय्यद शोएब हाशमी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उर्दू अकादमी महाराष्ट्र उपस्थित होते.यावेळी लेखक इस्माईल सुलेमान यांच्या ‘रोशनी’ या बालकथासंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.सय्यद शोएब हाशमी यांनी डी.एड. व बी.एड. विद्यार्थ्यांना MPSC परीक्षेचे महत्त्व सांगत शिक्षक म्हणून कार्यरत असतानाही स्पर्धा परीक्षांची तयारी करून भविष्यात धोरणकर्ते बनण्याचे आवाहन केले.डॉ.हसीन अख्तर यांनी आधुनिक शिक्षणात AI आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करत उर्दू भाषेच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. ‘कोणतीही भाषा यशाच्या मार्गात अडथळा ठरू शकत नाही; उर्दू माध्यमातून शिक्षण घेऊनही उच्च पदांवर पोहोचता येते,’ असे त्यांनी सांगितले. मुश्ताक करीमी यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले.इकरा पब्लिक स्कूलमध्ये AI Literacy अंतर्गत घेण्यात आलेल्या Prompt Examination मधील कनिष्ठ व वरिष्ठ गटातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.या अभिनव परीक्षेचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले. ‘रोशनी’ या पुस्तकातील बालकथाही विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, संस्कार आणि वाचनाची आवड निर्माण करणाऱ्या असल्याचे सांगून पुस्तकाचे कौतुक करण्यात आले.अध्यक्षीय भाषणात डॉ.अब्दुल करीम सालार यांनी AI चे वाढते महत्त्व अधोरेखित करत ‘नव्या तंत्रज्ञानाशी जोडलेले आणि काळानुसार स्वतःला विकसित करणारेच भविष्यात पुढे जातील,’ असे प्रतिपादन केले.कार्यक्रमास मजीद मेमन,शेख जफर,शेख नबी, आसिफ शाह,शेख अनिस,रशीद कासमी, सईदा वकील, शेख शकील व शेख अजीम यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख इश्तियाक यांनी केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६


## फिल्म फेस्टिव्हलमधून सायबर सुरक्षेचा जागर; विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सावधानतेचा संदेश




**छत्रपती संभाजीनगर :** सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, ऑनलाइन फसवणुकीचे नवनवे प्रकार आणि डिजिटल माध्यमांचा वाढता वापर या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात 'सायबर क्राईम आणि सायबर सुरक्षा : चित्रपटातून जागर' या संकल्पनेवर आधारित चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या चित्रपट महोत्सवाच्या उद्धाटनप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. अपर्णा अष्टपुत्रे उद्धाटक म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते उद्धाटनाचा व्हिडिओ दाखवून चित्रपट महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल यांनी या उपक्रमाला शुभेच्छा देत विद्यार्थिनींनी डिजिटल जगतात वावरताना सजग आणि जबाबदार राहण्याचे आवाहन केले.या महोत्सवात 'ब्लॅकमेल', 'सायबर सापळा', 'स्कॅम', 'डिजिटल अरेस्ट' आणि 'महाराष्ट्र सायबर क्रुसेड' या विषयांवरील शॉर्ट फिल्म्स दाखवण्यात आल्या. या चित्रपटांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना हॅकिंग, फिशिंग, आयडेंटिटी थेफ्ट, ऑनलाइन फ्रॉड, डिजिटल फसवणूक तसेच सायबर गुन्ह्यांच्या विविध पद्धतींची माहिती देण्यात आली.सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी मजबूत पासवर्डचा वापर, ऑनलाइन व्यवहार करताना सतर्कता, अनोळखी लिंकवर क्लिक करण्यापूर्वी विचार करणे, वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींशी शेअर न करणे आदी सुरक्षात्मक उपायांवरही मार्गदर्शन करण्यात आले. 'Think Before You Click' या संदेशातून डिजिटल जगतातील प्रत्येक कृतीपूर्वी विचार करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.शॉर्ट फिल्मच्या प्रदर्शनानंतर विद्यार्थिनी आणि मान्यवरांमध्ये खुला चर्चा-संवाद आयोजित करण्यात आला. या संवादात विद्यार्थिनींनी चित्रपटातून मिळालेली माहिती तसेच डिजिटल माध्यमांशी संबंधित आपले अनुभव मांडले. विद्यार्थिनींच्या प्रश्नांना आणि अनुभवांना मान्यवरांनी मार्गदर्शनातून प्रतिसाद दिला.यावेळी उद्धाटक डॉ. अपर्णा अष्टपुत्रे यांनी सायबर सुरक्षेचा महत्त्वपूर्ण पैलू स्पष्ट करताना, "प्रत्येक व्यक्तीने आपली प्रायव्हसी स्वतः निश्चित केली पाहिजे. कोणती माहिती सार्वजनिक करायची आणि कोणती वैयक्तिक ठेवायची, याचा निर्णय सोशल मीडियावर काहीही शेअर करण्यापूर्वी घेतला पाहिजे," असे प्रतिपादन केले. डिजिटल माध्यमांचा वापर करताना स्वातंत्र्याबरोबरच जबाबदारी आणि सजगता आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल यांनी चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून सामाजिक संवाद आणि जनजागृतीचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. चित्रपटांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न अधिक परिणामकारकपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतात आणि त्यांच्या विचारविश्वावर सकारात्मक प्रभाव निर्माण करता येतो, असे त्यांनी नमूद केले.मानसशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. रजनी सेनाड यांनी सायबर फसवणुकीचा अनुभव आल्यास घाबरून न जाता तो आपल्या पालकांशी किंवा विश्वासातील व्यक्तींशी शेअर करण्याचे आवाहन केले. "पालक ही प्रत्येकाच्या आयुष्यातील मजबूत सपोर्ट सिस्टीम आहे. संकटाच्या प्रसंगी त्यांच्याशी संवाद साधणे आणि मदत घेणे महत्त्वाचे आहे," असा संदेश त्यांनी विद्यार्थिनींना दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भार्गवी मोदी, प्रास्ताविक कु. राधिका दैठणकर यांनी केले, तर आभार कु. भाग्यश्री महातोले यांनी मानले. सायबर क्राईम आणि सायबर सिक्युरिटी या विषयाला साजेशी आकर्षक रांगोळी कु. अमृता गायके हिने साकारली.चित्रपट महोत्सवाची सांगता विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या सायबर सुरक्षा विषयावरील शॉर्ट फिल्मच्या प्रदर्शनाने करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थिनींना केवळ सायबर गुन्ह्यांची माहिती मिळाली नाही, तर सायबर सुरक्षेचा संदेश स्वतःच्या सर्जनशीलतेतून मांडण्याची संधीही मिळाली.'सायबर क्राईम आपल्या हातात नाही; पण सायबर सुरक्षा आपल्या हातात आहे' हा प्रभावी संदेश देणारा हा चित्रपट महोत्सव विद्यार्थिनींसाठी ज्ञानवर्धक, विचारप्रवर्तक आणि जागरूकता निर्माण करणारा ठरला.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील विद्यार्थिनींसह प्रा. डॉ. अंजली पंडित आणि प्रा. डॉ. सविता मनोहर यांनी अथक परिश्रम घेतले.


## मुरूममध्ये आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली




*फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयाच्या विस्तार केंद्राच्या वतीने साक्षरता रॅली काढताना मान्यवर व विद्यार्थी-विद्यार्थिनी.*

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या वतीने मंगळवारी (ता. ८) रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने काढण्यात आलेल्या साक्षरता रॅलीद्वारे नागरिकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व रुजवण्यात आले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते रॅलीचे उद्धाटन झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, डॉ. सतीश शेळके, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. राजकुमार रोहीकर, डॉ. रवींद्र आळंगे, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र गणापुरे, डॉ. सुधीर पंचगल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.' शिक्षणाचा घेऊ ध्यास, साक्षरतेने करू देशाचा विकास ', ' एकच नारा, एकच ध्यास-प्रत्येक हातात शिक्षणाचा प्रकाश ', ' साक्षर होऊ-सक्षम होऊ, देशाला प्रगत बनवू ' अशा प्रेरणादायी घोषणा देत विद्यार्थ्यांनी शहरात साक्षरतेचा संदेश दिला. या रॅलीमध्ये महाविद्यालयातील विविध शाखांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि विस्तार केंद्राचे विद्यार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनायक रासुरे, डॉ. शीला स्वामी, डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. राजकुमार तेलंग, प्रा. लक्ष्मण पवार, प्रा. सचिन राजमाने, डॉ. नितीन हुलसुरे आणि प्रा. अजिंक्य राठोड आदींनी पुढाकार घेतला.रॅलीच्या सुरुवातीला विस्तार केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश आडे यांनी आभार मानले.

## परभणी येथील १७ सप्टेंबरच्या निर्णायक महा मेळाव्याच्यासाठी घेणार आढावा



**हिंगोली ।** धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नाला निर्णायक दिशा देण्यासाठी धनगर आरक्षण योद्धे दिपकभाऊ बोराडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत परभणी येथे १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या निर्णायक महा मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व समाजबांधवांची महत्त्वपूर्ण बैठक घेणार असल्याची माहिती धनगर समाज नेते गोपाल सातपुते यांनी दिली.ही बैठक शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात पार पडणार आहे. या बैठकीदरम्यान धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीबाबत सविस्तर चर्चा, आगामी महा मेळाव्याची नियोजनपूर्व तयारी, समाजबांधवांमध्ये जनजागृती तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी जिल्हा संवाद साधण्यात येणार आहे. यानंतर पत्रकार परिषदही आयोजित करण्यात आली आहे.परभणी येथे १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या निर्णायक महा मेळाव्याला हिंगोली जिल्ह्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी व्हावेत, यासाठी बैठकीत व्यापक नियोजन करण्यात येणार आहे. आरक्षणाचा प्रश्न हा संपूर्ण धनगर समाजाच्या भवितव्याशी निगडित असल्याने पक्ष, गट, तट आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजहितासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.हिंगोली जिल्ह्यातील सकल धनगर समाज, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला तसेच समाजबांधवांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून १७ सप्टेंबरच्या परभणी महा मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन आव्हानकर्ते धनगर समाज नेते गोपाल सातपुते सचिन मस्के (नाईक) भगवान पावडे विष्णू पौळ पवन पोले शिवाजी कोल्हे यांनी केले आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६

## कन्नड तालुक्यातील रात्रीचे वीज भारनियमन बंद करा - एमआयएम



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील ग्रामिण भागातील रात्रीचे सिंगलफेज एजी(शेती) चे वीज भारनियमन तात्काळ बंद करण्या च्या मागणीचे निवेदन दि. 10 सप्टेंबर रोजी एमआयएम पक्षाच्या वतीने वीज वितरण कंपनीस देण्यात आले आहे. कन्नड़ तालुक्यात गेल्या पंधरा दिवसांपासुन ऐन संध्याकाळपासुन ते रात्री बारा, एक वाजेपर्यंत म्हणजेच सहा ते सात घंटे अचानक सिंगल फेज एजीवर लोडशेडींग चालु झाले आहे. कन्नड तालुक्यात व ग्रामीण भागातील जवळपास पन्नास टक्के शेतकरी हे आपापल्या शेतवस्तीवर आपल्या कुटुंबांसह वास्तव्य करुण राहतात. रात्री विज नसल्यामुळे शेत शिवारात बिबटे, रानडुक्कर, साप, विंचु आदी अनेक हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. आणि मुख्यत्वे करुण शालेय विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे मोठे नुकसान होत आहे. यामुळे ग्रामिण भागातिल शेतवस्तीवर राहणारे गरीब शेतकरी कुटुंबीयांचे अतोनात हाल होत आहे. इत्यादी कारणांमुळे ग्रामीण भागातिल शेतकरी हे फार त्रस्त झाले आहे. इत्यादी कारणांमुळे ग्रामीण भागातिल सिंगल फेज एजी वर होणारी रात्रीची लोडशेडींग तात्काळ बंद करण्यासाठी दि. 10 सप्टेंबर रोजी एमआयएम पक्षाचे माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील साहेब यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष शारेक नक्शबंदी आणि जिल्हाकार्याध्यक्ष जावेद पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता महावितरण कन्नड़ रमेश वाघचौरे साहेब यांना याविषयी निवेदन देण्यात आले.यावेळी एआयएमआयएम कन्नड तालुका अध्यक्ष नासेर पटेल, शहराध्यक्ष रईस पवार, एम डी पठाण, मौलाना आलीम, शेख अशफाक, अहेमद सय्यद, आबेद पिंजारी, इब्राहिम पठाण, सय्यद मतिन, आरेफ कुरैशी उपस्थित होते.

## तेलवाडी येथे वृक्षारोपण




**कन्नड :** संत तुकाराम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दत्तक घेतलेल्या तेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात विविध वृक्षांची रोपे लावण्यात आली. यात अशोका, नारळ व आवळा इत्यादी रोपे लावण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. तुकाराम कोल्हे, प्रा. डॉ. सरला गोरे यांनी केले होते. यावेळी तेलवाडी ग्रामपंचायत कर्मचारी ताराचंद चव्हाण, सुखलाल चव्हाण प्राथमिक शाळेतील शिक्षक श्री. आत्माराम राठोड व विजया हाडोळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अमोल भोसले व प्रा. राहुल देवरे यांनी प्रयत्न केले.

## बैलपोळा

चला चला तळ्यावर,सर्जा राजाला घेऊन.
घालू अंघोळ प्रेमाने,सुट्टी कामाला देऊन.

बैल धुवून निर्मळ,शिंग रंगाने रंगवू.
झुल त्याच्या पाठीवर,लाल नवीन पांघरू.

बांधु बाशिंग शिंगाला,गळी घुंगराच्या माळा.
तीट लावता बैलाला,शोभणार रंग काळा.

करू अवजार पूजा,ईळा,काठी,पास,फाळ.
गोंडे बांधता शिंगाला,शोभे बाशिंगाने भाळ.

राबतांना शेतामध्ये,दु:ख बापाचे जाणतो.
राब राबून शेतात.दिस सुखाचे आणतो.

करा पुरणाची पोळी,बैल पोळ्याच्या सणाला.
आज आनंद मिळेल,सर्जा राजाच्या मनाला.

उपकार फेडू त्याचे, घास पोळीचे भरून.
उतराई होऊ आज,सेवा मनाने करून.

सुख दु:खाचा सोबती,बापा सोबत जागतो.
सुखी ठेवावे बैलांना,वरदान मी मागतो.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. ८८३०६३५६९१**

## श्री संचारेश्वर विद्यालयात मातृदिन व बैलपोळा उत्साहात संपन्न



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** श्री संचारेश्वर प्राथमिक विद्यालय, जिंतूर येथील संस्कार केंद्रामध्ये गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी मातृदिन व बैलपोळ्यानिमित्त विविध उपक्रमांनी भरलेला कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी सोमोसे तर प्रमुख पाहुण्या व वक्त्या म्हणून संपदा देशपांडे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शिशुवाटिकेत मोनिका घोडके , शिक्षिका राणूबाई सुग्रामकर व अश्विनी पांडे यांनी चिमुकल्यांकडून नृत्य सादर करवून घेतले. या नृत्यातून चिमुकल्यांनी बळीराजाला मानवंदना दिली. तसेच विद्यार्थ्यांनी बैल सजवुन आणले आणि विद्यार्थी व विद्यार्थीनी शेतकरी या वेशभूषेत आले आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते बैल पुजन करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी मातीचे बैल तयार करून आकर्षक पद्धतीने सजवून आणले. तसेच इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी शेतीच्या विविध अवजारांची सचित्र भित्तीपत्रके तयार केली. कागद व पुठ्ठ्याचा वापर करून शेतीच्या अवजारांच्या प्रतिकृतीही विद्यार्थ्यांनी तयार केल्या. प्रमुख वक्त्या संपदा देशपांडे यांनी मातृदिनाचे महत्त्व तसेच बैलपोळा या सणाची परंपरा, सांस्कृतिक महती आणि शेतीमध्ये बैलांचे असलेले महत्त्व विद्यार्थ्यांना सुंदर व समर्पक शब्दांत समजावून सांगितले. भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सवांना केवळ आनंदाचे स्वरूप नसून त्यातून निसर्ग, पशुपक्षी, वनस्पती आणि शेतीशी संबंधित घटकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये हीच संस्कारमूल्ये रुजावीत, निसर्गाशी असलेले आपले नाते दृढ व्हावे आणि श्रमसंस्कृतीची जाणीव निर्माण व्हावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांना व सर्जनशीलतेला सुंदर स्वरूप दिल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या कार्यक्रमासाठी संस्कार केंद्रातील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६


## आदिवासी ठाकरी परंपरेनुसार बैलपोळा उत्साहात साजरा



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील निरगुडी बु ठाकरवाडी आदिवासी ठाकर समाजाच्या पारंपरिक संस्कृतीचे जतन करत निरगुडी बु ठाकरवाडी येथे आदिवासी ठाकरी परंपरेनुसार बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना आंघोळ घालून सजवले, शिंगे घोळून,शिंगांना फुगे, रंगीबेरंगी सजावट केली पायात पैजण , बैलांच्या पाठीवर मालकाचे आडनाव, बैल राजांचे नाव तसेच बैलांची पूजा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.शेतीच्या कामात वर्षभर शेतकऱ्यांना साथ देणाऱ्या बैलांप्रती आदर व्यक्त करण्याची ही परंपरा असून, आदिवासी ठाकर समाजामध्ये बैलपोळ्याला विशेष महत्त्व आहे. पारंपरिक पद्धतीने बैलांची पूजा, नैवेद्य देण्यात आले यावेळी महिलांनी त्यांची आदिवासी परंपरेनुसार पुजा करून पोळा सोडण्यात आला, पुरुष आणि बालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.आदिवासी ठाकर समाजाच्या पारंपरिक रूढी, संस्कृती आणि लोकपरंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा सणांचे महत्त्व कायम राहावे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. परिसरात दिवसभर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## पावसाच्या दडीमुळे दिंद्रुड परिसरात खरीप हंगाम पूर्णपणे उद्ध्वस्त:




**वडवणी :** पावसाने पाठ फिरवल्याने आणि दिर्घकाळ मारलेल्या दडीमुळे दिंद्रुड परिसरातील शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. पावसाअभावी खरीपातील पिके करपू लागली आहे. डोळ्यादेखत पिके उद्ध्वस्त होत असल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला असून शेती करणेच आता जिकिरीचे झाले आहे.

यंदा सुरुवातीच्या पावसावर (मृग नक्षत्रावर) शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. या वर्षीचा खरीप भरघोस उत्पादन देईल अशी आशा येथील शेतकऱ्यांना लागली होती. मात्र त्यानंतर पावसाने मोठ्या प्रतिक्षेची दांडी मारल्याने पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही. सोयाबीनची वाढ खुंटली, फुले गळाली, पाने वाळली, उरल्यासुरल्या शेंगा पाण्याअभावी अंगात भरल्या नाहीत. दिंद्रुड सह परिसरातील नित्रुड, तेलगाव, नाखलगाव, पिंपळगाव, बाभळगाव, संगम, बेलुरा, आलापूर, देवळा खु., उमरी बु., भोपा, चोपनवाडी, फकीर जवळा, चिखली, देवदहिफळ, चाटगाव, कांदेवाडी, कासारी, हिंगणी आदि गाव-खेड्यात शिवारातील अनेक शेतांमध्ये पिकांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. कापूस पिकालाही पावसाअभावी मोठा फटका बसला असून उत्पादनात प्रचंड घट होण्याची शक्यता आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर हजारो रुपये खर्च करूनही हातात काहीच पडणार नसेल तर पुढे जगायचे कसे? असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे. शेतीवर वर्षभराचे आर्थिक गणित अवलंबून आहे.

## त्रैमासिक तिफणचे महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर





**कन्नड :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त त्रैमासिक तिफण परिवारातर्फे दिले जाणारे 'महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२६' जाहीर करण्यात आले आहे.तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी ही घोषणा केली. यंदाचे पुरस्कार कन्नड तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणारे शिक्षक व प्राध्यापकांना देण्यात येणार आहेत.महात्मा फुले यांनी शिक्षणातून सामाजिक क्रांती घडवली. त्यांच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थी घडवण्याचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करणे, हा या पुरस्काराचा मुख्य हेतू आहे. तालुक्यातील शिक्षकांनी केलेले शैक्षणिक, साहित्यिक , संशोधनात्मक आणि सामाजिक कार्य लक्षात घेऊन निवड समितीने ही निवड केली आहे.यंदाचे ११ पुरस्कारार्थी - डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. संजय भालेराव, डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. आर. एम. घोती, प्रा. रामनाथ टेकाळे, किशोर घुगे, प्रविण दाभाडे, अनिता राठोड आणि दिपाली घुगे.या सर्व पुरस्कारार्थींचा सन्मान कन्नड येथे होणाऱ्या विशेष पुरस्कार वितरण सोहळ्यात करण्यात येणार आहे. अशी माहिती संयोजक तथा त्रैमासिक तिफण चे संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी दिली.

## माळीवाडा येथे पारंपरिक मानाचा पोळा उत्साहात फुटला



**दौलताबाद (जावेद अहमद)** : माळीवाडा येथे गुरुवारी (दि. १०) सायंकाळी ६.१५ वाजता पारंपरिक मानाचा पोळा उत्साहात फुटला. गावातील येशीत मानाचा पोळा भरण्यात आला. परिसरातील शेतकरी बांधवांनी आपल्या बैलजोड्या आकर्षक पद्धतीने सजवून प्रथम लक्ष्मीमातेचे दर्शन घेतले. त्यानंतर सजविलेल्या बैलजोड्यांसह येशी येथे एकत्रित येत पारंपरिक पद्धतीने पोळा साजरा केला.येशी येथे आंब्याच्या पानांचे तोरण बांधण्यात आले होते. मानकरी पुजाऱ्यांच्या हस्ते विधिवत पूजा करून नारळ फोडल्यानंतर मानाचा पोळा फुटला. त्यानंतर सजविलेल्या बैलजोड्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. मारुती मंदिराला प्रदक्षिणा घालून बैलांना घरोघरी नेण्यात आले. शेतकरी कुटुंबांनी बैलांची पूजा करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला.या वेळी सुभाष मुळे, कृष्णा मुळे, दत्तू मुळे, नारायण मुळे, कडू किर्तीकर, गणेश आस्वार, ग्रामविस्तार अधिकारी बालकृष्ण गव्हाणे, सुनील मुळे, सुधाकर हेकडे, एकनाथ सिरसाठ, धनराज शेरकर, मनेश गाजरे, रामेश्वर बाभळे,मनोज गाजरे,वैजनाथ हेकडे, शिवाजी मुळे, पोलीस पाटील प्रमोद साठे यांच्यासह समस्त ग्रामस्थ उपस्थित होते. पोळा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर चौक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.शुक्रवारी लक्ष्मीआईची बैलगाड्यांची यात्रापोळ्याच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी पाडव्याच्या निमित्ताने माळीवाडा येथील माता लक्ष्मीआईची नवसाच्या बारा बैलगाड्यांची यात्रा भरणार आहे. ही यात्रा गेल्या १५० वर्षांपासून सुरू असलेली पारंपरिक परंपरा असल्याने ग्रामस्थांमध्ये या यात्रेबाबत विशेष उत्साह आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६


# एकटेपणाचे तत्वज्ञान : 'मी एकटा निघालो



मार्गावरून माझ्या मी एकटा निघालोडोळ्यात चंद्र जखमी घेऊन मी निघालो आले भरून डोळे या लाडक्या फुलांचे अनुबंध पाकळ्यांचे तोडून मी निघालोव्याकूळ पाखरांनी लडिवाळ हट्ट केला भाषेत हुंदक्यांच्या बोलून मी निघालोघोटाळले नदिचे पायात मुक पाणी डोळ्यात वाट त्याला देवून मी निघालो झोपेत हासणाऱ्या चुंबन राहुलाशीमाझ्या यशोधरेला सोडून मी निघालो...विदर्भाच्या कवितेत काही नावे अशी आहेत की ती महाराष्ट्रभर पोहचली नाहीत, पण त्यांचा आवाज थेट काळजापर्यंत पोहोचतो. उ. रा. गिरी हे त्यातलेच एक नाव आहे. कवितेचा शोध घेतांना समाज माध्यमावर उ. रा. गिरी यांची कविता वाचायला मिळाली. ' मी एकटा निघालो ' कविता मला खूपच आवडली. मी पुन्हा कवितेच्या कविचा शोध घेऊ लागलो. या कवितेच्या वाटेवर मला प्रा. मिनल येवले यांचा उ. रा. गिरी यांच्या कवितेवर आधारित एक लेख वाचावयास मिळाली. त्यातून त्यांची कविता लक्षात आली. मिनल येवले या नागपूरच्या प्रसिद्ध कवयित्री आहेत. त्यांचा व माझा परिचय आहे. त्यामुळे मी त्यांच्याकडे या संग्रहाची विचारपूस केली. त्यांनी गिरी यांच्या कन्येचा मोबाईल नंबर दिला. एके दिवशी त्यांनी मला उ. रा. गिरी यांचा ' मी एकटा निघालो ' या संग्रहाची झेरॉक्स प्रत पाठवली. ती कविता मी पुन्हा पुन्हा वाचू लागलो. किती ताकदीचा हा कवी होता, मात्र त्यांना फारशी प्रसिद्धी का मिळाली नसावी ही खंत वाटली. त्यांचा जीवन शोध घेतांना त्यांचा परिचय होत गेला.दहा ऑक्टोबर एकोणीसशे एकोणतीस रोजी जन्मलेले उत्तमराव रामजी गिरी यांचे सगळे आयुष्य नागपूरच्या परिसरात गेले. आकाशवाणी नागपूर, तिथले साहित्यिक वातावरण आणि आतल्या आत घुसमटणारा एक संवेदनशील माणूस, अशी त्यांची ओळख होती. स्वभावाने ते अतिशय मितभाषी होते. फारसे मंचावर दिसले नाहीत, पुरस्कारांच्या गर्दीत दिसले नाहीत. पाच सप्टेंबर एकोणीसशे शहाऐंशी रोजी वयाच्या छप्पनव्या वर्षी ते गेले तेव्हा त्यांच्या जवळ दोनच संग्रह होते, मी एकटा निघालो जो एकोणीसशे त्र्याऐंशी साली आला आणि चंद्रायणी जो एकोणीसशे चौऐंशी साली आला. पण या दोन संग्रहांनीही त्यांना मराठी कवितेत कायमचे स्थान दिले.'मी एकटा निघालो 'या कविता संग्रहाचे एक वेगळेपण आहे. या संग्रहातल्या प्रत्येक कवितेखाली कवीने ती कविता कधी लिहिली याची तारीख दिली आहे. त्यामुळे या कविता एकोणीसशे चौसष्ट ते एकोणीसशे एक्क्याऐंशी या सतरा वर्षांच्या काळात लिहिल्या गेल्या हे आपल्याला समजते. म्हणजे ही एकटे निघण्याची भावना एका रात्रीत आलेली लहर नाही, ती सतरा वर्षे मनात धुमसत असलेली एक अवस्था आहे. या संग्रहातल्या अठ्ठावीस रचनांपैकी पंधरा रचना गझलच्या तंत्रात यशस्वी झाल्या आहेत असे अभ्यासक सांगतात. एकोणीसशे पासष्ट साली लिहिलेली कर सैल तू गळ्यातील ही त्यांची पहिली गझल मानली जाते. पण मी एकटा निघालो ही रचना गझल नाही, ती गझलच्या लयीवर चालणारी मुक्त कविता आहे, जिच्या प्रत्येक कडव्याचा शेवट मी निघालो या एकाच ध्रुवपदावर होतो आणि त्यामुळे वाचताना पावले चालल्याचा भास होतो.या कवितेचा वरचा अर्थ अगदी साधा वाटतो. एक माणूस आपल्या वाटेने एकटा निघालाय. पण आतला अर्थ खूप खोल आहे. तो म्हणतो मार्गावरून माझ्या मी एकटा निघालो. इथे माझ्या या शब्दावर सगळा भार आहे. हा दुसऱ्याने दाखवलेला महामार्ग नाही, हा कुणीतरी आखून दिलेला राजमार्ग नाही, हा माझा स्वतःचा मार्ग आहे. आणि या मार्गावर गर्दी नाही. सत्याच्या मार्गावर गर्दी कधीच नसते. गर्दी नेहमी सोप्या रस्त्यावर असते. स्वतःचा मार्ग शोधणे हीच पहिली एकटेपणाची पायरी आहे. आणि पुढच्या ओळीत तो म्हणतो डोळ्यात चंद्र जखमी घेऊन मी निघालो. चंद्र हे सहसा शीतलतेचे, प्रेमाचे, साक्षीचे प्रतीक असते. पण इथे चंद्र जखमी आहे. म्हणजे ही पौर्णिमेची रात्र नाही, ही वेदनेची रात्र आहे. जो निघतोय त्याच्या मनात उजेड आहे, पण तो जखमी उजेड आहे. आपण जेव्हा आपल्या माणसांना सोडून जातो तेव्हा आपल्याला आनंद होत नाही, अपराधीपणाची एक जखम सोबत येते. ती जखम घेऊनच निघावे लागते.दुसऱ्या कडव्यात तो फुलांबद्दल बोलतो. आले भरून डोळे या लाडक्या फुलांचे, अनुबंध पाकळ्यांचे तोडून मी निघालो. संसार म्हणजे काय तर लाडकी फुले. ती फुले सुंदर आहेत, सुगंधी आहेत, लाडकी आहेत. पण त्यांच्या पाकळ्यांशी आपले अनुबंध असतात. अनुबंध हा शब्द गिरींनी फार विचार करून वापरला आहे. बंध म्हणजे जबरदस्ती, अनुबंध म्हणजे मनाने जुळलेले बंध. हे बंध तोडणे सगळ्यात कठीण असते. फूल तोडणे सोपे असते, पण पाकळ्या तोडताना हात थरथरतो. डोळे भरून येणे ही त्या थरथरत्या हाताचीच निशाणी आहे. त्याग हा दगड होऊन करता येत नाही, तो हळव्या मनानेच करावा लागतो, हे गिरी इथे सुचवतात.तिसऱ्या कडव्यात ती व्याकूळ पाखरे येतात. व्याकूळ पाखरांनी लडिवाळ हट्ट केला, भाषेत हुंदक्यांच्या बोलून मी निघालो. जेव्हा तुम्ही एकटे निघता तेव्हा तुम्हाला अडवणारे अनेक असतात. ही पाखरे म्हणजे तुमची माणसे, तुमचे आईवडील, तुमचे मित्र, तुमचा समाज. ते तुम्हाला रागाने अडवत नाहीत, ते व्याकूळ होतात आणि लडिवाळ हट्ट करतात. जाऊ नकोस, इथेच रहा, असा हट्ट. आणि अशा वेळी मोठमोठे शब्द काम करत नाहीत. तिथे फक्त हुंदके उरतात. हुंदक्यांची भाषा ही जगातली सगळ्यात प्रामाणिक भाषा आहे. तिथे खोटे बोलता येत नाही.चौथे कडवे या कवितेतले सगळ्यात सुंदर आणि सगळ्यात गहन कडवे आहे. घोटाळले नदिचे पायात मुक पाणी, डोळ्यात वाट त्याला देवून मी निघालो. नदीचे पाणी पायात घोटाळणे म्हणजे काय तर नदीने अडवणे. पण नदी बोलत नाही, ती मुक आहे. हे मुक अडवणे शब्दांच्या अडवण्यापेक्षा जास्त वेदनादायी असते. घर सोडताना उंबरठ्यावर उभी असलेली आई जेव्हा काहीच बोलत नाही, फक्त डोळ्यांनी पाहत राहते, तसे हे मुक पाणी आहे. आणि त्या मुक पाण्याला तो काय देतो, तर डोळ्यात वाट. तो तिला सोबत देऊ शकत नाही, तो तिला थांबू शकत नाही, पण तो तिला एक वचन देतो की माझ्या डोळ्यात तुझ्याकडे परत येण्याची वाट कायम राहील. किती मोठी कल्पना आहे ही. वाट देणे म्हणजे नाते संपवणे नाही, तर नात्याला एक वेगळे रूप देणे आहे.आणि मग शेवटचे कडवे येते आणि सगळे चित्रच बदलून जाते. झोपेत हासणाऱ्या चुंबन राहुलाशी, माझ्या यशोधरेला सोडून मी निघालो. इथे कळते की हा निघणारा सामान्य माणूस नाही, हा कपिलवस्तूचा राजकुमार सिद्धार्थ आहे. झोपेत हसणाऱ्या राहुलाला त्याने चुंबन दिले आहे आणि झोपलेल्या यशोधरेला सोडून तो बाहेर पडला आहे. हा महाभिनिष्क्रमणाचा क्षण आहे. पण गिरींचा सिद्धार्थ हा पुराणातला देव नाही. तो एक बाप आहे ज्याला आपल्या मुलाचा मोह होतो, तो एक नवरा आहे ज्याला आपल्या बायकोबद्दल प्रेम वाटते. तरीही तो निघतो, कारण त्याला दुःखाचे मूळ शोधायचे आहे.यातूनच एकटेपणाचे तत्त्वज्ञान उभे राहते. आपण सहसा एकाकीपणा आणि एकटेपणा एकच समजतो. पण दोन्ही वेगळे आहेत. एकाकीपणा हा लादलेला असतो, तो माणसाला संपवतो. गर्दीतही माणूस एकाकी असू शकतो. पण एकटेपणा हा स्वीकारलेला असतो, तो माणसाला घडवतो. सिद्धार्थाला कोणी घराबाहेर काढले नव्हते, त्याच्याकडे सगळे होते, तरीही तो एकटा निघाला. कारण काही प्रश्नांची उत्तरे गर्दीत मिळत नाहीत. स्वतःला शोधण्यासाठी, सत्याला शोधण्यासाठी एकटे व्हावेच लागते. ही भारतीय परंपरा आहे. बुद्ध असो, महावीर असो किंवा तुकाराम असो, सगळ्यांना एकटे निघावेच लागले.आजच्या काळात या कवितेचे महत्त्व अधिकच वाढले आहे. आज आपण कधीच एकटे नसतो. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यामुळे आपण सतत गर्दीत असतो. पण ही गर्दी आपल्याला स्वतःपासून दूर नेते. 'मी एकटा निघालो 'ही कविता आपल्याला सांगते की कधीतरी थांबावे, मागे वळून पाहावे आणि आपल्या स्वतःच्या मार्गावरून एकटे निघावे. शिक्षणासाठी गाव सोडणारा विद्यार्थी असो, नोकरीसाठी घर सोडणारा तरुण असो, किंवा एखाद्या ध्येयासाठी सगळे सोडणारा कलाकार असो, सगळ्यांच्या डोळ्यात तोच जखमी चंद्र असतो. सगळ्यांना तीच लाडकी फुले सोडावी लागतात.उ. रा. गिरी यांनी कमी लिहिले, पण जे लिहिले ते काळाच्या कसोटीवर टिकणारे लिहिले. त्यांच्या कवितेचा शेवट मी पोहोचलो असा नाही, तर मी निघालो असा आहे. कारण एकटेपणाला पोहोचणे नसते, त्याला फक्त निघणे असते. प्रवास हाच त्याचा मुक्काम असतो. आणि म्हणूनच ही कविता आजही जिवंत आहे. जो कोणी मनापासून एकटा होतो, त्याच्या ओठावर हीच ओळ येते, मार्गावरून माझ्या मी एकटा निघालो


**डॉ. शिवाजी हुसे**
**मो. +91 94040 00398**



